
बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक - ०७ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - 9403478540

दैनिक मंगळवार ४ नोव्हेंबर २०२५

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

TRENDING NEWS



सेटवरून रडत निघून गेली होती अनन्या पांडे:अभिनेत्रीसमोर फराह म्हणाली - मी ज्याला रडवते, तो मोठा स्टार बनतो

पान 3 वर

## थोडक्यात

### अपघातात एसटी कर्मचाऱ्याचा मृत्यू

**यवतमाळ :** जिल्हा परिषद कार्यालयासमोरील रस्त्यावर (दि. २९) मध्यरात्री अज्ञात चारचाकी वाहनाने धडक दिल्याने एसटी कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. सिद्धार्थ सुरेशचंद्र पांडे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. पांडे हे पायदळ जात असताना, अज्ञात चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवून त्यांना धडक दिली. यात गंभीर जखमी होऊन ते मरण पावले. मनमोहन दुबे (वय ७५) यांच्या तक्रारीवरून अवधुतवाडी पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### दुचाकी लंपास

**यवतमाळ :** शहरातील पार्वती शोरूमच्या सर्व्हिस सेंटरमधून वीस हजार रुपये किमतीची मोटारसायकल (एमएच-२९ बीए ३०४६) चोरीला गेल्याची घटना (दि. १८) घडली. गणेश हरीभाऊ भंडारकर (वय ३८, रा. शास्त्री नगर) यांनी याप्रकरणी तक्रार दिली. (दि. १८) सकाळी अकराच्या सुमारास त्यांनी दुचाकी सर्व्हिस सेंटर येथे ठेवली होती. तेथून अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याप्रकरणी (दि. २) अवधुतवाडी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### धारदार शस्त्राने हल्ला

**यवतमाळ:** नवीन कपडे घेण्याच्या कारणावरून झालेल्या वादात, एका २६ वर्षीय तरुणावर धारदार वस्तूने हल्ला करण्यात आला. ही घटना (दि. १) आठवडी बाजार कमानीजवळील हॉटेलसमोर घडली. पवन संतोष काकडे (वय २६) याच्या तक्रारीनुसार, संशयित आरोपी अभय ऊर्फ प्रीतम पातोडे (वय २३) व त्याच्या एका साथीदाराने संगनमत करून वाद घातला. त्यांनी धारदार वस्तूने पवनच्या कमरेवर व करंगळीला मारून जखमी केले. तसेच, जीवे मारण्याची धमकी दिली. अवधुतवाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

### दुचाकी लंपास

**यवतमाळ :** शहरातील संभाजी नगर, वाघापूर रोड परिसरातून पन्नास हजार रुपये किमतीची मोटारसायकल (एमएच-२९ सीजी ३८२७) चोरीला गेली. वैभव गोविंदराव धामनवार (वय २५) यांनी याप्रकरणी तक्रार दिली. (दि. २६) रात्री अकरा ते (दि. २७) सकाळी सातच्या दरम्यान, त्यांनी दुचाकी उभी केली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याप्रकरणी (दि. २) लोहारा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### कुऱ्हाडीने हल्ला

**यवतमाळ :** जागेच्या जुन्या वादातून एका ४० वर्षीय व्यक्तीने कुऱ्हाडीने हल्ला केल्याची घटना (दि. १) घटाना येथे घडली. लखन कदू राठोड (वय ३२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, (दि. १) सायंकाळी सातच्या सुमारास यशवंत विद्यालयाजवळ, संशयित आरोपी गजानन मोतीसिंग चव्हाण (वय ४०) याने जुन्या वादाच्या कारणावरून शिवीगाळ केली. त्याने हातातील कुऱ्हाडीने लखन यांच्या डाव्या डोळ्यावर मारून जखमी केले. वडगाव जंगल पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

# 1 किमीपर्यंत लोकांना चिरडले

## जयपूरमध्ये भीषण अपघात : वाहनांना चिकटले मांसाचे तुकडे, हातपाय तुटले

बातमी जगत | प्रतिनिधी


**14 ठार**













**जयपूर :** जयपूरमध्ये एका भरधाव वेगाने येणाऱ्या डंपर ट्रकने एकामागून एक १७ वाहनांना धडक दिली. या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला. अनेकांचे हातपाय तुटले. रस्ता रक्ताने माखला होता. चालक मद्यधुंद अवस्थेत होता.

अपघातात १० हून अधिक जण जखमी झाले आहेत. तिघांना गंभीर अवस्थेत एसएमएस हॉस्पिटल ट्रॉमा सेंटरमध्ये रेफर करण्यात आले आहे. पोलिसांनी सांगितले की, हा अपघात सोमवारी दुपारी हरमारा येथील लोहा मंडी येथे झाला. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास डंपर महामार्गावर जाण्यासाठी रोड क्रमांक १४ वरून लोहा मंडी पेट्रोल पंपाकडे जात होता. या घटनेदरम्यान, तो वाहनांना धडकला. वाहतूक वळवण्यात आली आहे. घटनास्थळावरून डंपर हटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. डंपर इतक्या वेगाने जात होता की रस्त्याच्या मधोमध येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला त्याने चिरडले. फोटोंमध्ये धडक दिसून येते. रस्त्याच्या मधोमध असलेले अडथळे पूर्णपणे वाकलेले होते. स्विफ्ट डिझायरचा हुड, ट्रकचे टायर, दुचाकीची नंबर प्लेट आणि वाहनांशी संबंधित इतर वस्तू रस्त्यावर पडल्या होत्या. घटनास्थळी उपस्थित असलेले राकेश कुमार जांगिड आणि रामदयाल मीणा म्हणाले, "हा अपघात आमच्या समोरच झाला. रस्त्याच्या चुकीच्या बाजूने येणाऱ्या एका डंपरने प्रथम चौकात एका दुचाकीला चिरडले. नंतर त्याने स्विफ्ट कारसह तीन वाहनांना चिरडले." पोलिसांनी सांगितले की, अपघाताचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे, ज्यामध्ये डंपर १०० किमी प्रतितास पेक्षा जास्त वेगाने धावताना दिसत आहे आणि तो वाहनांना धडकताना तसेच लोकांना चिरडताना दिसत आहे. मद्यधुंद डंपर चालकाला घटनास्थळी उपस्थित लोकांनी पकडले. दुचाकीस्वार आलोक बन्सल या अपघातातून थोडक्यात बचावला. "मी ऑफिसमधून कामासाठी निघालो होतो आणि वॉशरूम वापरण्यासाठी थांबलो होतो," तो म्हणाला. "डंपरने भरधाव वेगाने माझ्या जवळून प्रवास केला. काही सेकंदातच त्याने एका दुचाकीला धडक दिली, जी पूर्णपणे खराब झाली. दुचाकीस्वाराने रस्त्यावरून उडी मारून आपला जीव वाचवला. तथापि, अपघातात त्याचे वाहन पूर्णपणे नष्ट झाले." प्रत्यक्षदर्शी राहुल चौधरी म्हणाले, "डंपरचालक मद्यधुंद अवस्थेत होता आणि चुकीच्या बाजूने गाडी चालवत होता. आम्ही हाताने मृतदेह बाहेर काढले. काहींच्या मानेवर, तर काहींच्या पायांवर जखमा आढळल्या. पिकअपच्या बॉडीवर मांसाचे तुकडे चिकटलेले दिसले. हा अपघात भयानक होता."

## आजाद समाज पार्टीचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ समाधान पदमणे



**मेहकर :** दि. ३ नोव्हेंबर रोजी भीम आर्मी प्रणित आजाद समाज पार्टी च्या वतीने विविध मागण्यांसाठी गटविकास अधिकारी, पं.स. मेहकर यांना एक निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे त्यांनी प्रलंबित भरती प्रक्रियेवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे आपल्या निवेदनात म्हटले आहे की नल-जल मित्र, प्लंबर, इलेक्ट्रिशियन, गवंडी यांच्या जागा ग्रामपंचायत स्तरावर भरायच्या आहेत. नल-जल मित्रांच्या जागेसाठी अर्ज भरून झालेल्या परीक्षांपैकी काही उमेदवारांच्या लेखी परीक्षा सोमवार, २३/०९/२०२४ रोजी, तर ऑनलाईन परीक्षा गुरुवार, १७/१०/२०२४ रोजी पार पडल्या आहेत. या परीक्षा होऊन बराच कालावधी लोटला असूनही, अद्याप कोणत्याही प्रकारचा निकाल जाहीर झालेला नाही. या संदर्भात भाई सुमेध अवसरमोल यांनी प्रशासनाला स्पष्ट केले की, प्रशासनाने या नल-जल मित्रांच्या भरतीचा निकाल तातडीने जाहीर करून जागा ग्रामपंचायतींमध्ये भरण्यात याव्यात. सुमेध अवसरमोल यांनी भूमिका मांडताना सांगितले की,या मागण्यांसंदर्भात प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा भीम आर्मी प्रणित आजाद समाज पार्टी द्वारे आक्रमक स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल यावेळी त्यांच्यासोबत तालुका उपाध्यक्ष रंजीत सदावर्ते, आर्यन खरात, विनोद जाधव, पंजाबराव गवई, विनायक अवसरमोल, वैभव कटारे तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेतर्फे सरदार पटेल व इंदिरा गांधींना अभिवादन

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित



**देऊळगाव राजा :** देऊळगाव राजा (दि. ३१) – भारताचे पहिले गृहमंत्री व लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी या दोन्ही स्मृतिदिनांचे औचित्य साधून देऊळगाव राजा तालुका सेवा निवृत्त कर्मचारी संघटना, स्व. भास्करराव शिंगणे सार्वजनिक वाचनालय, जनसेवा सामाजिक समिती तसेच जेष्ठ नागरिक संघटनेतर्फे विरंगुळा भवन, आठवडी बाजार येथे संयुक्तरित्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवा निवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष बळीराम मापारी होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस निरीक्षक ब्रह्मगिरी, संघटनेचे माजी अध्यक्ष गोविंदराव अहिरे, धनसिंग शिपणे, प्रकाश खांडेभराड, गोविंदराव बोरकर, मधुकरराव धुळे, रमेश नरोडे, प्रकाश अहिरे, प्रा. अशोक डोईफोडे, प्रा. विनायक कुलकर्णी, पंडितराव पाथरकर, रामदास कुलथे, मार्तंड आप्पा घिके, विनोद जाधव व घनश्याम भंडारे यांची उपस्थिती होती. या प्रसंगी मान्यवरांनी सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या कार्याविषयी प्रेरणादायी विचार मांडले. वाचनालयाचे अध्यक्ष प्रकाश खांडेभराड यांची बुलढाणा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या महासचिवपदी निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश अहिरे यांनी केले तर आभार प्रदर्शन संघटनेचे सचिव गोविंदराव बोरकर यांनी केले. कार्यक्रमास सेवानिवृत्त कर्मचारी व विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चारित्र्यहनन करणाऱ्या रुपाली चाकणकर अजूनही पदावर कशा?: फलटण प्रकरणी प्रकाश महाजनांचा सवाल

बातमी जगत | प्रतिनिधी



**बीड :** फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी विरोधकांनी सरकारला चांगलेच घेरले आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या सुषमा अंधारे यांनी थेट फलटण पोलिस स्टेशनसमोर ठिय्या आंदोलन केले होते. आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी देखील राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर टीका केली आहे. मृत डॉक्टरचे चारित्र्यहनन करणाऱ्या रुपाली चाकणकर अजूनही पदावर कशा? अजित पवार अशा कोणत्या रूपात अडकले आहेत? असा सवाल महाजन यांनी विचारला आहे.

फलटण प्रकरणी रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेत मृत महिला डॉक्टरचे चॅट समोर आणले होते. यावरून प्रकाश महाजन यांनी टीका केली आहे. ते म्हणाले, रुपाली चाकणकर यांनी त्या मृत महिलेचे चारित्र्यहनन केले आहे. ती डॉक्टर बीड जिल्ह्यातील असल्याने आमचे भावनात्मक नाते आहे. एवढे होऊनही रुपाली चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्षपदी कशा? अजित पवार कोणत्या रूपात अडकले आहेत? असा सवाल महाजन यांनी उपस्थित केला. मंत्री जयकुमार गोरे यांनी देखील मृत महिलेच्या चारित्र्यावर बोट ठेवले होते. यावर प्रकाश महाजन म्हणाले, जयकुमार गोरे यांनीही मृत महिलेच्या चॅटिंगवर भाष्य करत तिचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला. जयकुमार गोरे यांचे लोकांनी काय काय दाखवले नाही? ज्या महिलेला एक कोटी रुपये देताना ट्रॅप करण्यात आले ते एक कोटी गोरेंकडे कसे आले हे ईडीने त्यांना विचारले. त्यांच्या दृष्टीने स्त्री जर फक्त उपभोगाची वस्तू असेल तर त्यांच्या तोंडून हे वक्तव्य येणार. हे कोणीही मुळ भाजपचे नाहीत, ते बाहेरून आले आहेत, त्यांनी बाहेरून येताना हा रोग आणला, अशी खोचक टीका महाजन यांनी केली आहे. तसेच राज्याचा एक मंत्री असे कसे काय बोलू शकतो? समजा त्या महिलेची चॅटिंग असेल तर तुम्ही काय तिला आत्महत्या करायला लावणार का? असा संतप्त सवालही महाजन यांनी उपस्थित केला आहे.

## दोन कोटींची लाच मागणारा PSI अटकेत:ACB ने रंगेहाथ पकडले

बातमी जगत | प्रतिनिधी

**पुणे :** तब्बल दोन कोटी रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेला पोलिस उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली आहे. लाचेच्या मागणीतील 46 लाख 50 हजार रुपये स्वीकारताना सापळा रचून एसीबीच्या पथकाने ही कारवाई केली असून, आरोपीला 6 नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे व्यवसायाने वकील असून त्यांच्या आशिलाविरुद्ध बावधन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्यात आशिलाच्या वडिलांना अटक झाली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. या गुन्ह्याचा तपास पीएसआय प्रमोद चिंतामणीकडे होता. तक्रारदाराच्या आशिलाला मदत करण्यासाठी आणि अटकेत असलेल्या वडिलांच्या जामीन प्रक्रियेत सहकार्य करण्याच्या मोबदल्यात उपनिरीक्षक चिंतामणी याने दोन कोटी रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार केल्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणीत, आरोपी उपनिरीक्षकाने दोन कोटींपैकी एक कोटी रुपये स्वत:साठी आणि उर्वरित एक कोटी रुपये वरिष्ठांसाठी मागितल्याचे उघड झाले. त्यानंतर तक्रारदाराने पहिला हप्ता म्हणून 50 लाख रुपये देण्याचे ठरवले. लाचलुचपत विभागाने सापळा रचून पीएसआय प्रमोद चिंतामणी याला तक्रारदाराकडून 46 लाख 50 हजार रुपये (यात 1.5 लाख रुपये खऱ्या आणि 45 लाख रुपयांच्या खेळण्यातील नोटांचा समावेश होता) घेताना रंगेहात पकडले. त्याच्याकडून लाचेची रक्कम, दोन मोबाईल फोन आणि रोख रक्कम मिळून एकूण 46.53 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## श्रीतेज कदम आयोजित किल्ले स्पर्धेत श्री विश्वेश्वर कृपा मित्र मंडळ नंदीमाळ नाका प्रथम क्रमांक

### छत्रपती शिवरायांचे विचार आपल्या आयुष्यात महत्त्वाचे - प्रसाद भोईर

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर



**पेण :** छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांनी संपूर्ण मराठी मनासाठी जी संस्कृती आपल्यासाठी दिली आहे त्याची जाणीव आपल्याला व पुढील पिढीला असावी त्यांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचावे आणि युवा पिढीच्या कलागुणांना वाव मिळावा अशा उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली होती. सर्व लहान मुलांनी यामध्ये उत्साहाने भाग घेतला. फक्त आपल्या कलेचे गुणदर्शन न दाखवता त्यातून अत्यंत चांगला संदेश देण्याचा प्रयत्न या तरुण पिढीने दिलेला आहे छत्रपती शिवरायांचे विचार आपल्या आयुष्यात कसे महत्त्वाचे आहेत या दृष्टिकोनातून ही स्पर्धा राबवली गेली आणि भविष्यात देखील अशा स्पर्धा आम्ही राबवू असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांनी किल्ले प्रतिकृती बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलताना सांगितले. शिवसेना महाराष्ट्र वाहतूक सेना महाराष्ट्र राज्य सचिव श्रीतेज कदम यांच्या पुढाकाराने दिवाळी सणानिमित्त भव्य किल्ले प्रतिकृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शिवसेना कार्यालय येथे रायगड संपर्कप्रमुख प्रसाद दादा भोईर यांच्या हस्ते संपन्न झाला. सदर किल्ले स्पर्धा पेण शहर मर्यादित होती. यामध्ये असंख्य स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.यामध्ये श्री विश्वेश्वर कृपा मित्र मंडळ नंदीमाळ नाका येथे प्रतापगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती साकारण्यात आली होती. त्यांना प्रथम क्रमांक आणि ५५५५ रोख रक्कम बक्षीस व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तर क्रांती कॉम्प्लेक्स बाल मित्र मंडळ कुंभाराळी यांनी सिंहगड किल्ला प्रतिकृती बनवली होती त्यांना द्वितीय क्रमांक आणि ३३३३ रुपये बक्षिस व सन्मानपत्र देण्यात आले.त्यानंतर पेण दातार आळी मधील हर्षित,आराध्य, पार्थ, आर्यन यांनी विशालगड व पन्हाळगड तसेच पावनखिंड अशी प्रतिकृती तयार केली होती त्यांना तृतीय क्रमांक रुपये २२२२ आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच या स्पर्धेत समर्थनगर रामवाडी येथील प्राप्ती, साईराज, मीत, अजय, अनुज यांनी महाराष्ट्रात असलेल्या देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धे शक्तिपीठ असलेल्या वणीच्या सप्तशृंगी गडाची प्रतिकृती तयार केली होती त्यामुळे त्यांना चतुर्थ क्रमांक रुपये ११११ व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या बक्षीस वितरण कार्यक्रमाला रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद दादा भोईर, रायगड जिल्हा समन्वयक नरेश गावंड, पेण तालुका प्रमुख समीर म्हात्रे, शिवसेना वाहतूक सेना महाराष्ट्र सचिव श्रीतेज कदम, महिला आघाडीच्या दीपश्री पोटफोडे, शहर प्रमुख सुहास पाटील,उपतालुकाप्रमुख चेतन मोकल, महाराष्ट्र वाहतूक सेनेचे जिल्हा कार्याध्यक्ष नरेश सोनवणे, जिल्हा संघटक विजय पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुमित बामणे, रोनिक झेमसे, तालुका अध्यक्ष सुयश पाटील, शहर अध्यक्ष समीर साठी, शहर उपाध्यक्ष सचिन बांदिवडेकर, ज्येष्ठ शिवसैनिक तुकाराम म्हात्रे,युवा सेनेचे राकेश मोकल इतर पदाधिकारी व शिवसैनिक यावेळी उपस्थित होते.

# भारतीय महिलांनी दाखवलं : स्वप्नं जर मनापासून पाहिली, तर सीमा काहीच नाहीत

**हॉलीवूडच्या झगमगाटात भारतीय लेकींचं तेज झळकलेलं पाहून प्रत्येक भारतीयाचं हृदय अभिमानाने भरून आलं. ज्या स्वप्नांची पायवाट कधी फक्त स्वप्ननगरीपर्यंत सीमित होती, ती आज वास्तवात उतरताना दिसते आहे. कला, परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर भारताच्या लेकींनी 'जग जिंकलं' आणि साकार केलं ते अधुरं स्वप्न, जे आज प्रत्येक भारतीय डोळ्यात चमकतं आहे. झगमगत्या मंचावर जेव्हा भारतीय महिलांच्या क्रिकेट संघाने विजयी जल्लोष साजरा केला, तेव्हा संपूर्ण भारताने श्वास रोखून तो क्षण अनुभवला. कधी केवळ पुरुषप्रधान खेळ मानला जाणारा क्रिकेट आज स्त्रियांच्या घामाने, संघर्षाने आणि आत्मविश्वासाने नव्या अर्थाने उजळला आहे.**





प्रवीण बागडे
नागपूर, 9923620919
बातमी जगत


ही केवळ विजयी धाव नव्हती तर ती होती अनेक दशकांच्या मेहनतीची, समाजाच्या शंकेची आणि स्वतःवरच्या न संपणाऱ्या विश्वासाची फळं. 'भारताच्या लेकींनी जग जिंकलं' हे वाक्य आता फक्त एक शीर्षक राहिलेलं नाही, तर ते एक घोषणा बनलं आहे. भारतीय स्त्रीशक्तीच्या अमर पराक्रमाची! मिथक तोडणाऱ्या या खेळाडूंनी दाखवलं की, कसोटी मैदानावर असो की जीवनात, धैर्य आणि चिकाटीचं बॅटिंग केलं तर कोणतीही डावसंख्या जिंकता येते. जेमिमाह रॉड्रिग्स, हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केवळ ट्रॉफीच नाही जिंकली, तर असंख्य मुलींची स्वप्नं साकार केली. जगभरात भारताचं नाव उजळवणाऱ्या या लेकी अभिमान, प्रेरणा आणि संघर्षाचं प्रतीक. वर्ल्ड कप स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड महिला संघाशिवाय वर्ल्ड कपची फायनल रंगल्याचे पाहायला मिळाले. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील फायनलसह २५ वर्षांनंतर नवा वर्ल्ड चॅम्पियन मिळणार हे आधीच ठरलं होतं. अखेर तिसऱ्या प्रयत्नात भारतीय महिला संघाने वर्ल्ड कप ट्रॉफीचं स्वप्न साकार केले. नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमवर रंगलेल्या महिला विश्वचषकातील अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत पहिली वहिली विश्वचषक स्पर्धा जिंकत इतिहास रचला आहे. शफाली वर्माच्यासह दीप्ती शर्माच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने २९९ धावांचा बचाव करत शेवटी बाजी मारली. २००५ आणि २०१७ मध्ये अधुरं राहिलेल स्वप्न हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघानं स्वप्ननगरीत साकार करून दाखवलं. भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिका संघाची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने शतकी खेळी केली. तिने भारतीय संघाचं टेन्शन वाढवलं होते, पण दीप्तीच्या गोलंदाजीवर तिने मोठा फटका खेळला अन् अमनजोत कौरनं तिसऱ्या प्रयत्नात कॅच पूर्ण करत तिसऱ्या प्रयत्नात ट्रॉफी जिंकण्याचा मार्ग मोकळा केला. दक्षिण आफ्रिकेला हरवून महिला टीम इंडिया अजिंक्य झाली आणि शेवटी भारताच्या लेकींनी 'जग जिंकलं' स्वप्ननगरीत अधुरं स्वप्न केले साकार! 2007 साली प्रदर्शित झालेल्या चक दे! इंडिया या चित्रपटात शाहरुख खाननं साकारलेला कोच कबीर खान हा पात्र खऱ्या आयुष्यातल्या एका घटनेवर आधारित होता. या पात्रामागे प्रेरणा होती मीर रंजन नेगी. भारतीय हॉकीचा माजी गोलकीपर. १९८२ च्या आशियाई स्पर्धेत भारताला पाकिस्तानकडून १-७ असा पराभव पत्करावा लागला होता. त्यावेळी नेगींवर देशद्रोहाचे आरोप झाले, माध्यमांनी आणि जनतेने त्यांच्यावर तीव्र टीका केली. त्यांच्या आयुष्यावर काळोख पसरला. काही वर्षांनी त्यांनी महिला हॉकी संघाच्या प्रशिक्षकपदी जबाबदारी घेतली. त्यांचं काम, समर्पण आणि विश्वास यांच्या जोरावर भारताच्या महिला हॉकी संघाने २००२ च्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला! याच वास्तवातून चक दे! इंडियाची कथा जन्माला आली. चित्रपटात कबीर खानवर 'देशद्रोही' ठरवण्यात येतो, पण शेवटी तो भारताला जिंकवून आपली ओळख पुनःप्रस्थापित करतो. हेच मीर रंजन नेगींच्या जीवनाचं प्रतिबिंब होतं. त्यावर शाहरुख खान म्हणाला होता "हा चित्रपट फक्त हॉकीबद्दल नाही; तो 'सेकंड चान्स' मिळाल्यावर काय करता येतं, हे सांगतो." "चक दे! इंडिया"नं फक्त एक खेळ दाखवला नाही तर त्याने शिकवलं की, अपयशावर मात करून, समाजाच्या शंकेला उत्तर देत, मेहनत आणि एकतेनं देशाचं नाव पुन्हा उजळवता येतं. भारतीय महिला संघाने टॉस गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात २९८ धावा करत दक्षिण आफ्रिकेच्या संघासमोर २९९ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने सेमी फायनलनंतर फायनलमध्येही शतक करत वर्ल्ड रेकॉर्ड रचला. वर्ल्ड कपच्या एका हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम तिने आपल्या नावे केला. पण शेवटी भारतीय संघाने फायनल बाजी मारत अधुरं स्वप्न साकार केलं. भारतीय महिलांच्या या विजयानं समाजातील जुनी विचारसरणी डळमळवली आहे. आता क्रिकेट हे 'पुरुषांचं खेळणं' नाही, तर प्रत्येक भारतीय मुलीच्या आत्मविश्वासाचं प्रतीक आहे. आज या विजयानं शाळा, गल्ल्या आणि मैदानं नव्या आवाजाने गाजत आहेत. "मी सुद्धा खेळेन, मी सुद्धा जिंकेन!" हा विजय फक्त खेळाचा नाही तर तो आहे समानतेचा, संघर्षाचा आणि ओळख निर्माण करण्याचा विजय. स्वप्ननगरीत जे कधी अधुरं वाटत होतं, ते आज या भारताच्या लेकींनी पूर्णत्वास नेलं.

---




गणेश निकम केळवदकर
(पत्रकार बुलढाणा)


# वेगळ्या वाटेवरचा प्रवासी



***विधवा प्रथा ही परंपरेने चालत आलेली प्रथा आहे. कदाचित हजारो वर्षापासून विधवा महिला त्यात भरडल्या जात असेल. पतीचे निधन पत्नीसाठी अंगावर काटा आणणारे ठरते.स्वतः व कुटुंबाचे कसे होणार? हा प्रश्न तर असतो. त्यातही पतीच्या निधनाला तिला जबाबदार धरण्यात येते.. ही करंटी, पांढऱ्या पायाची त्यामुळे पती गेला अशी कुटुंबाची धारणा झाल्यास त्या महिलेचे जीवन अक्षरशः नरक बनते. आयुष्याचा जोडीदार गेलेला, कुटुंबाकडून असहकार तर समाजाच्या विकृत नजरा यात तिचे जीवन होरपळून जाते. अगतिक विधवा महिलांचे सामाजिक व कौटुंबिक शोषण हा देखील मुद्दा आहे. या विषयाकडे पाहणाऱ्या बुलढाण्याच्या प्राध्यापक डीएस लहाने यांनी झोकून देऊन या क्षेत्रात काम सुरू केले आहे. विधवा व एकल महिलांसाठी रक्षाबंधन हा छोटा कार्यक्रम सर्वप्रथम घेऊन त्यांनी विधवांसाठी कार्य सुरू केले. ही छोटीशी सुरुवात होती.**

आज विविध उपक्रम राबवून हा मार्ग त्यांनी अधिक प्रशस्त केला आहे. रक्षाबंधन, विधवा परिषद, विधवा व एकल महिलांचे विवाह सोहळे, त्यांच्या साठी रोजगार मिळावे, गौरीपूजन, गावागावात विधवा प्रथा न पाळण्याची शपथ घेणे, शासनाकडून तसे परिपत्रक काढणे असे एक ना अनेक उपक्रम मानस फाउंडेशनच्या माध्यमातून राबविले जात आहे. आतापर्यंत त्यांनी 115 विधवांचे लग्न लावून दिले आहे तर अडीचशे विधवा महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.बुलडाणा जिल्ह्यात जवळपास दहा हजारापेक्षा अधिक विधवा महिलांनी विधवा प्रथा देखील नाकारली आहे.सामाजिक सुधारणेच्या या कार्यामुळे केवळ राज्याचेच नव्हे तर देशाच लक्ष मानस फाउंडेशनच्या कार्याकडे पर्यायाने या फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष असलेल्या डी एस लहान यांच्याकडे लागले आहे. या कार्याची सुरुवात झाली तेव्हा अत्यंत वाईट अनुभव त्यांना आले. विधवांसाठीच कार्य का ? असा कुश्चित सवाल देखील अनेकांनी केला.तर ज्या कुटुंबात विधवा महिला लग्नासाठी तयार केल्या त्या कुटुंबातील व्यक्तींकडून शिव्यांची लाखोली वाहिली गेली. सावित्रीबाई फुले मुलींना शिक्षण देतेवेळी जसे शेण गोळे खावे लागले, महात्मा जोतीराव फुले, धोंडो केशव कर्वे या समाजसुधारकांना जसा अपमान गीळावा लागला त्यापेक्षा वेगळी स्थिती इथे नव्हती. आज मात्र त्यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## कोण आहेत डीएस लहाने

प्राध्यापक डी एस लहाने पेशाने शिक्षक होते.बुलढाणा येथील रुखाई कन्या विद्यालयात 1994 साली ते शिक्षक म्हणून रुजू झाले तर 2020 साली त्यांनी सेवा निवृत्ती घेतली. एमए एम्फिल झालेले प्राध्यापक लहाने सध्या पूर्ण वेळ मानस फाउंडेशनच्या माध्यमातून विधवांसाठी कार्य करतात. या फाउंडेशनचे ते संस्थापक अध्यक्ष आहे. याच फाउंडेशनच्या माध्यमातून देशाचे लक्ष वेधणारे अनेक उपक्रम राबविले जातात. याशिवाय शैक्षणिक संस्था व बँकांच्या माध्यमातून त्यांनी मोठे कार्य केले आहे.

## विविध उपक्रम ठरले लक्षवेधी

विधवा महिलांसाठी कार्य करण्याचा विचार त्यांच्या मनात बऱ्याच दिवसापासून होता मात्र करावे की नाही ही द्विधा मनस्थिती त्यांच्या मनात होती. कारण हे कार्य दिसते तितके सोपे नव्हते. सन 2022 साली या महिलांसाठी त्यांनी पहिले रक्षाबंधन घेतले. सागवान परिसरात त्यांनी विधवा भगिनी साठी रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन केले. विशेष बाब म्हणजे हजारो विधवा या कार्यक्रमास उपस्थित झाल्या. त्यांनी प्राध्यापक लहान यांच्या हातावर राखी बांधली. रक्षाबंधनाच्या नात्याप्रमाणे राखी बांधणाऱ्या बहिणीची त्यांनी साडीचोळी देऊन बीदागी केली याच दिवशी कायमस्वरूपी पाठीशी उभा राहणार भाऊ त्यांना मिळाला.अशी सुरुवात झाली यानंतर 11 एप्रिल 2023 मध्ये पहिला विधवा मेळावा बुलढाण्यातील शिवसाई युनिव्हर्स मध्ये पार पडला. पहिलाच मेळावा म्हटल्यावर सर्वांनाच उत्सुकता होती. तर बुलढाणा करांसाठी ही आश्चर्यकारक बाब होती. मात्र या कार्यक्रमासाठी देखील शेकडोच्या संख्येने विधवा महिला उपस्थित झाल्या होत्या. या दोन कार्यक्रमां नंतर त्यांनी पूर्ण वेळ या कामात झोकून दिले. दहा डिसेंबर 23 रोजी बुलढाण्यात ऐतिहासिक अशी विधवा परिषद घेण्यात आली. 3 जानेवारीला चिखली येथे एकल महिला व विधवा महिलांचा परिचय मेळावा, 12 जानेवारी 24 रोजी सिंदखेड राजा येथे विधवांचा विवाह सोहळा, याच ठिकाणी 30 जानेवारी रोजी भव्य अशी विधवा परिषद घेण्यात आली.मधल्या काळात पुन्हा छोटे-मोठे उपक्रम सुरूच् होते. विधवांसाठीचे कार्य सन 2025 मध्ये सातत्यपूर्ण पार पडल् आहे. प्रत्येक महिन्यात एक किंवा दोन उपक्रम घेण्यात आले. जानेवारी 2025 मध्ये मलकापूर येथे विधवा परिषद तर अकोला जिल्ह्यात एक परिषद घेण्यात आली. एप्रिलमध्ये बुलढाण्यातील भातृमंडळ मंगल कार्यालयात विधवा विवाह सोहळा पार पडला. या ठिकाणी विधवा वधूंची उघड्या जीप वर भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. आनंदात नाचणारे मानस फाउंडेशनचे कार्यकर्ते तर वर बापाच्या भूमिकेत वावरणारे प्राध्यापक लहाने बुलढाणाकरानी पाहिले. याच महिन्यात सैनिक मंगल कार्यालयात पुन्हा एक विधवा विवाह सोहळा घेण्यात आला. मे महिन्यात मोताळा व हरसोडा येथे भव्य असे कार्यक्रम घेण्यात आले.

## अर्थकारणाचाही विचार केला

विधवा महिलांसोबत संवाद साधल्यानंतर त्यांना भेडसावणारी सर्वात मोठी समस्या ही आर्थिक मिळकतीची आहे हे लक्षात येते.विधवा महिलांना कुटुंबाकडून सन्मानजनक वागणूक मिळत नाही. बऱ्याचदा मिळणारे हक्क देखील नाकारले जातात. घरातून पाठबळ नसतेच अशा वेळी या महिलांना रोजगार देता यावा यासाठी बुलढाणा शहरीतील व्यापाऱ्यांसोबत त्यांनी बैठक घेतली व रोजगार मेळाव्याची एक रुपरेषा तयार करण्यात आली. बुलढाण्यात घेण्यात आलेला हा रोजगार मेळावा अडीचशे महिलांना रोजगार देऊन गेला. व्यापाऱ्यांनी त्यांना लागणारे मनुष्यबळ विधवा महिलांच्या रूपाने स्वीकारले. तर शिलाई मशीन देऊन या महिलांना दोन पैसे देण्याची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. तुळशीनगर येथे असणाऱ्या प्राध्यापक लहाने यांच्या कार्यालयात छोट्या मोठ्या कामा पासून विधवांच्या मालमत्तेच्या समस्यांपर्यंत अनेक महिला समस्या घेऊन येत असतात. हे कार्यालय जणू त्यांचे हक्काचे ठिकाण झाले आहे. व लहाने यांच्या रूपाने त्यांना हक्काचा भाऊ देखील मिळाला आहे. विधवा महिलांसाठी समाज पुरुषांनी कार्य केले हा इतिहास झाला. गेल्या दीडशे वर्षात विधवांसाठीची चळवळ जवळपास थांबली होती मात्र प्राध्यापक डी एस लहाने यांनी बुलढाण्यातून या चळवळीला मोठे पाठबळ दिले आहे. विधवा महिलांना सन्मान जनक वागणूक मिळावी यासाठी त्यांचा सुरू असलेला लढा भविष्यकाळात निश्चितच दखलपात्र ठरेल. महापुरुषांचे कार्य पूर्वी होऊन गेले आपण हे इतिहासामध्ये वाचतो परंतु सामाजिक सुधारणा सारखा आगळावेगळा विषयी निवडून प्राध्यापक लहाने यांचं कार्य प्रत्यक्षात आज सुरू आहे आणि बुलढाणेकर त्याचे जिवंत साक्षीदार देखील आहेत.

---

# तुळशी विवाहाची हिवरा आश्रम परिसरात धूम

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**देऊळगाव माळी** : दिवाळी संपताच सर्वांना तुळशी विवाहाचे वेध लागतात. कार्तिक एकादशीनंतर, देवउठणी एकादशीला विष्णूदेव चार महिन्यांच्या निद्रा अवस्थेतून जागे झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तुळशीचे बाळकृष्ण किंवा शालिग्रामरुपी विष्णूशी लग्न लावले जाते. या सोहळ्याने दिवाळीची सांगता होते. हिवरा आश्रम परिसरात तुळशीविवाहाची सध्या मोठी धूम असून, या दिवसापासूनच लग्नाच्या मुहूर्तांना सुरुवात होते, जे कार्तिक पौर्णिमेपर्यंत चालतील. विवाह सोहळ्याची तयारी आणि परंपरा

विवाहाच्या पूर्वदिवशी तुळशी वृंदावन रंगवून सुशोभीत केले जाते.

वृंदावनात ऊस आणि झेंडूची फुले अर्पण केली जातात, तर मुळाशी चिंचा आणि आवळे ठेवले जातात.

तुळशीला नवरीप्रमाणे सजवले जाते; तिला साडी, नथ, सोन्याचे दागिने आणि मंगळसूत्र परिधान केले जाते, तसेच चांदीची जोडवी घालून खना-नारळाने ओटी भरली जाते.

तुळशीची गौरीप्रमाणे पूजा केली जाते आणि तिला नैवेद्याचे गोड पदार्थ अर्पण केले जातात. हा विवाह सोहळा गोरज मुहूर्तावर संध्याकाळी संपन्न होतो. तुळशीचा विवाह केल्याने भगवान विष्णू आणि लक्ष्मी प्रसन्न होतात, अशी श्रद्धा आहे. हा सोहळा कुटुंबीय सदस्यांसोबत आणि प्रियजनांसोबत थाटामाटात



साजरा करण्यात आला.यावेळी श्रीमती. शांताबाई म्हस्के, सौ. रत्नमालाताई शिंदे, सौ. शालिनीताई भाकडे, सौ विमलताई दाशरथे, सौ अरुणाताई म्हस्के, सौ. प्रियंकाताई सुरुशे, सौ शुभांगी कांबळे, सौ ज्योती पैठणे, हिंमतराव रहाटे, भागवतराव भाकडे, दत्तात्रय दशरथे, आदींची उपस्थिती होती. या विवाह सोहळ्याचे बहारदार मंगलाष्टके सेवानिवृत्त शिक्षक दत्तात्रय दशरथे यांनी केली.

## कविता

### सागर

अथांग सागर! जलाचं आगर!
जीवांचा जागर! अहोरात्र!!

जल चर जीव! भ्रमण करता!
गोलात फिरता! सागरात!!

सागराचा तळ! वाटतो निर्मळ!
जगते लव्हाळ! समुद्रात!!


अंनत सजीव! कार्यात भरीव!
जगतात जीव! खाऊनच!!

निर्मिती प्रवाळ! झाली जीव वाढ!
पडलीत माळ! उत्पतीत!!

निर्मिलीय सृष्टी!वाटे सागराने!
भरलं जलाने! जलाशय!!

प्रदीप सांगतो! सागराची कथा!
जीवनात व्यथा! सर्वांच्याच!!

## कविता



### सागर किनारा

सागर किनारी मारू फेरी
काय करतेस रोज घरी
सुंदर दिसशील गं परी
तिथं बसु शांत थोडं तरी .

जीवनाच्या वाटेवर सखी
गाणं गाऊ दोघं एकमुखी
सूर जुळवू होऊत सुखी
ओठ ओठावर मुका मुखी.

सागर लाटा गाताय गित
साथीत जुळे सूर संगीत
बहरू दे आपलीच प्रित
सागर किनारी हिच रीत.

धुंद होतं करूया साजरा
घेऊन स्पर्श सुखात जरा
येतो आठवणींना उजाळा
सखी वाट बघतो किनारा.


प्रदीप पाटील
गणपूर( जळगाव)
मो. 9922239055

## घटना-घडामोडी



### मनमानीचा कारभार की वरिष्ठांचा आशीर्वाद? दोन वर्षांपासून 'अतिरिक्त प्रभार' कायम, कार्यालयात अंतर्गत कलह वाढला! जनतेतून संतापाची लाट!

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित

**दे.राजा :** पंचायत समितीच्या बालविकास प्रकल्प कार्यालयात गेल्या दीड ते दोन वर्षांपासून सुरू असलेला मनमानीचा कारभार आता चर्चेचा विषय ठरत आहे. सहाय्यक गटविकास अधिकारी पदावर असताना बालविकास अधिकारीचा अतिरिक्त प्रभार मुंडे यांच्या कडे देण्यात आलेला असून, हा प्रभार अद्याप कायम आहे. वर्ग दोनचे पद असूनही वर्ग तीनच्या अधिकाऱ्याकडे हा प्रभार देण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अंगणवाडी सेविकांना बैठकीसाठी योग्य व्यवस्था उपलब्ध नसल्याने त्यांना पशुवैद्यकीय दवाखान्याच्या आवारात बसावे लागते, ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे. सेविकांसाठी कार्यालयात स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याऐवजी त्यांना अयोग्य ठिकाणी बसवले जाते, तसेच नियमित भेट व मीटिंग घेण्यात येत नाही, असा आरोप कर्मचाऱ्यांकडून केला जात आहे.या मनमानी कारभारामुळे कार्यालयात अंतर्गत कलह निर्माण झाला असून, पर्यवेक्षकांमधील व वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील विसंवाद वाढताना दिसत आहे. विशेष म्हणजे, कार्यालयात तीन वरिष्ठ पर्यवेक्षिका असताना सुद्धा मुंडे यांच्यावर सीनियर असूनही चौथ्या क्रमांकावर प्रभार देण्यात आला आहे, हे अनेकांना खटकणारे ठरले आहे. स्थानिक पातळीवर तसेच कार्यालयातूनही वारंवार तक्रारी करूनही, वरिष्ठ उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आशीर्वादामुळे हा प्रभार आजपर्यंत कायम असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जनतेतून आणि कर्मचाऱ्यांतून आता तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. अनेकांनी मागणी केली आहे की, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करून, मुंडे यांचा अतिरिक्त प्रभार त्वरित कमी करून, योग्य पात्र वर्ग दोनच्या अधिकाऱ्याला पदभार देण्यात यावा. लोकांमध्ये चर्चा रंगली आहे — एवढ्या तक्रारी असूनही कार्यवाही होत नाही, म्हणजे कुठेतरी पाणी मुर्त्यांना दिसतेय का?"मुंडे पर्यवेक्षिका असून, त्यांचेकडे एका बीट चा प्रभार असून, त्यांचेकडे असलेल्या अतिरिक्त प्रभारामुळे अंगणवाडी कामकाजाकडे दुर्लक्ष होत असून, कुपोषण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर प्रकरणाकडे वरिष्ठ अधिकारी व जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी जनतेतून जोरदार मागणी होत आहे.

### २.५० कोटींच्या विकासकामांचा भव्य लोकार्पण सोहळा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित

**दे.राजा :** माजी आ. डॉ. शशिकांत खेडेकर यांनी दे.राजा नगरपरिषद क्षेत्रात २ कोटी ५० लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचे लोकार्पण करून आपल्या वचनांची पूर्तता केली. डॉ. खेडेकर यांच्या नेतृत्वाखालील या 'वचनपूर्ती' सोहळ्याला



दे.राजाच्या जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांना 'विकास पुरुष' असे संबोधले. या भव्य सोहळ्यात नगरातील विविध प्रभागांमधील अनेक लोकहिताची कामे पूर्णत्वास नेण्यात आली, ज्यात प्रभाग १ श्री मारुती मंदिर (संजय नगर) येथील कंपाउंड वॉल आणि भगवान गौतम बुद्ध विहार सामाजिक सभागृह. प्रभाग ६ श्री खोरेश्वर महादेव मंदिर सभागृह, पत्रकार भवन (ज्यामुळे पत्रकारांचा मार्ग मोकळा झाला), खोरेश्वर नगर क्रीडांगण, आणि मानसिंगपूरा श्री मारुती मंदिर सभागृह. प्रभाग ७ शिंगणे नगर क्रीडांगण. प्रभाग ८ श्री सुखानंद स्वामी मठ सभागृह. प्रभाग ४ श्री जिव्हेश्वर मंदिर सभागृह आणि कुंभारवाडा शनिवार पेठ येथील श्री मारुती मंदिर सभागृह. प्रभाग ३ मधील विवेकानंद नगर क्रीडांगण, प्रभाग २ मधील श्री भगवान बाबा नगरातील गोपीनाथ मुंडे साहेब उद्यान, तसेच कोष्टी समाज स्मशानभूमी दहन शेड. या सोहळ्याला शिवसेना पदाधिकारी, युवा सेना, महिला आघाडी आणि समस्त शिवसेना परिवारातील सर्व कार्यकर्ते तसेच प्रत्येक विभागातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनतेने डॉ. खेडेकर यांचे आभार मानत, शहराची विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू झाल्याची भावना व्यक्त केली.

## पान १ वरील

अभिनेत्री अनन्या पांडे आणि चित्रपट निर्माती-नृत्यदिग्दर्शिका फराह खान काजोल आणि ट्विंकल खन्नाच्या टॉक शो "टू मच" च्या पुढील भागात दिसतील. हा भाग ६ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होईल. एपिसोडपूर्वी, निर्मात्यांनी एक प्रोमो व्हिडिओ शेअर केला.व्हिडिओची सुरुवात फराह अनन्याकडे बोट दाखवून गंमतीने म्हणते, "ती माझी मुलगी असू शकली असती, कारण मला चंकी पांडेवर खूप प्रेम होते." तिच्या या बोलण्यावर सगळे हसतात.त्यानंतर अनन्या तिच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील एक प्रसंग सांगते, ती म्हणते, "मी खूप आत्मविश्वासू होती, पण मी रडत सेटवरून निघून गेले." यावर फराह उत्तर देते, "मी ज्याला रडवते ती नायिका मोठी स्टार बनते." काजोल तिच्या खेळकर पद्धतीने म्हणते, "मुझसे झूठ बोलो बेबी, मुझसे झूठ बोलो." काजोलचे हे विधान प्रोमोमध्ये पुन्हा एकदा हास्यास्पद वातावरण निर्माण करते.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी 'अशोक' टिकवणे गरजेचे: रामगिरी महाराज

## 'आपली आई ती आपलीच असते' या न्यायाने कारखान्याच्या ऊस गाळप हंगामाचा शुभारंभ

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ बाळासाहेब दुधाळे

**अशोकनगर :** अशोक सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ समारंभ नुकताच उत्साहात संपन्न झाला. यावेळी महंत रामगिरी महाराज यांनी कारखान्याचे महत्त्व विषद केले.

रामगिरी महाराज म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हितासाठी साखर कारखाना टिकवणे अत्यंत गरजेचे आहे. 'आपली आई ती आपलीच असते' या न्यायाने, कारखान्याच्या अडचणीच्या काळात तो आपलाच आहे असे मानून शेतकऱ्यांनी कोणताही राजकीय विचार न करता एकजूट करावी. या कारखान्यासाठी प्रत्येकाने वैयक्तिक



प्रयत्न केल्यास तो पुन्हा गतवैभव प्राप्त करू शकेल. त्यांनी यावेळी सर्व सभासदांना कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करण्याचे कळकळीचे आवाहन केले. माजी आमदार भा. बा. मुरकुटे यांनी कारखान्याच्या कारभाराची माहिती दिली. ते म्हणाले की, सध्या कारखान्यावर सुमारे १५०० कोटी रुपयांचे कर्ज आहे. मागील हंगामात मिळालेल्या उसातून १४ कोटी रुपयांची बिले चुकती केली आहेत. चालू हंगामात ८००० टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट असून, ४९०० टन साखर तयार झाली आहे. त्यांनी सभासदांना धीर देत कारखान्याला कर्जातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट केले. यावेळी कारखान्याचे अध्यक्ष बी. आर. म्हस्के, उपाध्यक्ष बाळासाहेब काकडे, माजी आमदार भा. बा. मुरकुटे, संचालक ज्ञानदेव साळुंके, सोपानराव राऊत, बाळासाहेब काकडे (शिरसगाव), शिवाजीराव कंद, अशोकराव खांदे, बाळासाहेब वाकचौरे, बी. चंदुराव घुले, श्री. चेअरमन माडगळ (संगमनेर), संजय मुदळे, सिंधुदारे हुकरे, बाबाजी मुदळे, डॉ. प्रल्हाद मुरकुटे, गो. लिंबारे, प्रा. डॉ. पी. आर. ससाणे, भाऊसाहेब उंडे, हिंमतराव घुमरे, निळू मुरकुटे, काशिनाथ मोराळे, कार्यकारी संचालक देसकर आरडीएस यांसह सर्व संचालक, अधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी सभासद उपस्थित होते.

## वसईकर फादर सायमन यांची पुणे धर्मप्रांताच्या बिशपपदी निवड

बातमी जगत | प्रतिनिधी

**पुणे :** गास गावचे सुपुत्र व पुणे धर्म प्रांतात पस्तीस वर्षांपासून कार्यरत असलेले व लोकांचे धर्मगुरू म्हणून ख्यातकीर्त असलेले फादर सायमन जॉकी आल्मेडा यांची पुणे धर्मप्रांताचे बिशप म्हणून पोप लिओ चौदावे यांनी नियुक्ती केलेली आहे .



मराठी व इंग्रजी भाषेवर अभूतपूर्व प्रभुत्व असलेले फादर सायमन यांनी पुणे धर्म प्रांतात वेगवेगळ्या पदावर कार्य केलेले असून सध्या ते चर्चच्या पश्चिम विभागीय परिषदेच्या उप सरचिटणीस पदाची जबाबदारी सांभाळत होते . मानसशास्त्र व समाजशास्त्र या विषयात त्यांनी परदेशी विद्यापिठात उच्च पदवी घेतलेली असून उत्तम संयोजक म्हणून त्यांचा लौकीक आहे . पुणे धर्मप्रांतामध्ये अर्थ प्रशासक म्हणून त्यांनी अनेक वर्ष जबाबदारी सांभाळली असून त्यांचा लोकसंग्रह अफाट आहे . उत्तम प्रवचनकार व बायबलचे निरूपणकार म्हणून ते ओळखले जातात . महाराष्ट्राच्या पाच जिल्ह्यात विस्तार असलेला पुणे धर्मप्रांत हा देशातला अति महत्त्वाचा धर्मप्रांत समजला जातो .आरोग्य ,शिक्षण व समाजसेवेचं प्रचंड मोठं जाळं या विभागात पसरलेलं असून देशातल्या प्रसिद्ध अशा पेपल गुरुविद्यालयाचे कुलगुरू म्हणून देखील नवनियुक्त बिशप कार्य पाहतील . फादर सायमन यांचे ज्येष्ठ बंधू फादर पिटर आल्मेडा हे सध्या वसई धर्म प्रांतात कार्यरत आहेत .नवनियुक्त बिशपांच्या नेमणुकी निमित्ताने वसईचे बिशप थॉमस डिसोझा व फादर जॉन्सन मिनेजीस, फादर ग्रेग परेरा यांनी बिशपांच्या गास येथील घरी भेट देऊन त्यांच्या कुटुंबांचे अभिनंदन केले.

## डोंगर शेवली येथील ग्रामपंचायत अधिकारी व्हीएस शेळके यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ गजानन दसरकर

**चिखली :** तालुक्यातील डोंगर शेवली येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक विजय शालिग्राम शेळके यांना सन 2025 मध्ये आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले आहे विजय शेळके हे सन 2005 मध्ये ग्रामसेवक म्हणून डोंगर शेवली या गावांमध्ये रुजू झाले 2005 ते 2014 पर्यंत त्यांनी नऊ वर्ष डोंगर शेवली गावामध्ये चांगली सेवा दिली त्यानंतर 2014 ते 2023 पर्यंत डासाळा व तोरण वाडा ह्या दोन ग्रामपंचायतींनी चांगल्या रीतीने सांभाळल्यामुळे त्यांना 2021 ते 2022 चा आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार प्रशासनाकडून जाहीर करण्यात आला सन 2023 पासून व्हीएस शेळके हे पुन्हा डोंगर शेवली या गावात रुजू झाले ते आज पर्यंत



डोंगर शेवली येथेच कार्यरत असताना त्यांना पुरस्कार आणि सन्मानित करण्यात आले त्यांनी Batch शेवली तोरणवाडा व डासाळा या गावांमध्ये चांगली सेवा दिल्यामुळे तिन्ही गावातून त्यांचे वर अभिनंदन आजचा होत आहे सदर पुरस्कार बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद आबा पाटील आणि सह पालकमंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला तसेच आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार सन 2017, 18 मध्ये आनंद शेषराव पाटील 2018,19 मध्ये विनायक छगनराव वायाळ 2019,20 मध्ये महेश रामकृष्ण राजपूत2020 2,021 प्रशांत गुलाबराव जाधव 2021 22 मध्ये विजय शालिग्राम शेळके 2022 23 मध्ये समाधान विष्णू पडघान सध्या तोरणमाळ येथे कार्यरत असलेले आणि 2023 24 मध्ये दीपक वाघजी गिरे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे सदर पुरस्कार सोहळा दिनांक 2 नोव्हेंबर 2025 वार रविवार रोजी राधा गोविंद मंगल कार्यालय चैतन्य वाडी येथे सकाळी 11 वाजता पार पडला असून सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे डोंगर शिवली वाशी यांनी मनापासून अभिनंदन केले असून सर्वांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत

## शहापुरात वारकरी कीर्तन महोत्सव जल्लोषात संपन्न....

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ वसंत पानसरे

**ठाणे :** शहापूर तालुक्यातील वारकरी तत्वज्ञान विद्यापीठ आणि छत्रपती शिवाजी महाराज मंदिर, शक्तिपीठ यांच्या संयुक्त विद्यामाने वारकरी तत्वज्ञान विद्यपिठ पाषाणे येथे वारकरी कीर्तन महोत्सव महाराष्ट्रातील किर्तणकार यांच्या प्रबोधनाने व मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला.

सोमवार २७ आक्टोबर ते सोमवार ३ नोव्हेंबर या कालावधीत विद्यापीठात काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, प्रवचण, कीर्तन, व महाप्रसाद अशी दिवसभर कार्यक्रमाची रेलचल पहायला मिळाली. यावेळी महाराष्ट्रातुन



सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प रामदास महाराज पाटील, ज्ञानेश्वर महाराज शिंदे, उल्हास महाराज सुर्यवंशी, भरत महाराज चौधरी, दिगंबर महाराज नरवडे, विश्वनाथ महाराज वारिंगे, सुभाष महाराज गेठे, व काल्याचे कीर्तन संजीवन महाराज पाटील यांनी केले तर वैभव मंडळीकसह अनेक कलाकारांनी उपस्थिती लावली. या कीर्तन महोत्सवात शहापूर सह ठाणे जिल्ह्यातील सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली. या भव्य कार्यक्रमाचे आयोजन वारकरी विद्यापीठाचे संस्थापक कैलास महाराज व छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे निर्माते राजुभाऊ चौधरी यांनी केले तर पाषाणे, वेहलोली, काजळविहिर, वालशेत, खातीवली सह पंचक्रोशीतील वारकरी व हरिभक्तांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहून शोभा वाढविली

## गुटखा माफियांचे पेव फुटले; मंगरूळपीर प्रशासन 'मूक-बधिर' दर्शकाची भूमिका!

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ दिलीप अवगण पाटील

**वाशीम :** मंगरूळपीर शहरात गुटखा माफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, शहराचे प्रशासन आणि पोलीस यंत्रणा या अवैध धंद्यापुढे पूर्णपणे निष्क्रिय ठरली आहे. मंगरूळपीर प्रशासन 'मूक-बधिर' दर्शकाच्या भूमिकेत असल्याने, राज्य सरकारने बंदी घातलेला गुटखा, तंबाखू आणि सुगंधी पानमसाला यांची विक्री शहराच्या कानाकोपऱ्यात उघडपणे फोफावत आहे. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा आणि अगदी गल्ल्यांमध्येही गुटख्याची विक्री सुरू आहे. काही किराणा दुकानदार आणि पानटपरीवाले गुप्त मार्गाने गुटख्याची विक्री करत असून, प्रशासनाला याची पूर्ण माहिती असूनही



जाणीवपूर्वक डोळेझाक केली जात आहे.

सामान्य नागरिकांच्या आरोग्याशी दिवसाढवळ्या खेळणाऱ्या या गुटखा माफियांवर कारवाई करण्यास प्रशासन का कचरत आहे? संबंधित प्रशासन आणि पोलिस यंत्रणा या अवैध धंद्यात असलेल्या काही प्रभावशाली मंडळींच्या दबावाखाली असल्यानेच ठोस कारवाई टाळत असल्याचा गंभीर आरोप शहरभर होत आहे. कारवाईच्या नावाखाली फक्त 'औपचारिकता' पूर्ण करून हात झटकले जात आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक संस्था व्यक्त करत आहेत.

युवक व्यसनाधीन, नागरिकांचा तीव्र आंदोलनाचा इशारा! गुटखा सेवनामुळे शहरातील युवकवर्ग मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन होत असून, भविष्यातील आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. प्रशासनाकडे लेखी निवेदने देऊनही कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. नागरिकांनी आता प्रशासनाला सरळ इशारा दिला आहे: शहरातील गुटखा विक्रेत्यांवर तात्काळ छापेमारी करून त्यांच्यावर कठोर आणि कायदेशीर कारवाई न झाल्यास, मंगरूळपीर नागरिक तीव्र जन-आंदोलन छेडतील. हा अवैध धंदा तात्काळ थांबवून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या माफियांना वेळीच ठेचले नाही, तर प्रशासनाला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील!

## संस्कृतीचे जतन; दे.माळी येथील 'ऋषी महाराज दत्त भजनी मंडळाची भजनातून समाज जागृती

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत

**देऊळगाव माळी :** जिथे मातीचे कणही संस्कृतीचा वारसा सांगतात, अशा देऊळगाव माळी (ता.मेहकर ) गावात 'ऋषी महाराज दत्त जनजागृती सांस्कृतिक भजनी मंडळाने' गेल्या २१ वर्षांपासून अखंड सेवेचा एक यज्ञ आरंभला आहे. महाराष्ट्राच्या लोककलेचे आणि भजनाचे वैभव जपत, हे मंडळ केवळ मनोरंजनाचे नाही, तर समाज परिवर्तनाचे एक सशक्त माध्यम बनले आहे.

या मंडळाची खरी ओळख आहे त्यांचे सदस्य. अरुण मोतेकर, अशोक वाघमारे, बद्री मगर ,श्रीराम मगर, अशोक काळे, विलास काळे, उमेश कुडके, शिवाजी तिडके, रामा अवचार,



अनंत तायडे, अरुण बळी, व शामराव धूड यांच्यासह गावातील अनेक कलावंत हि सर्व मंडळी कष्टकरी, शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबातून आलेली आहेत. दिवसभर मातीत घाम गाळूनही, हे सर्वजण रात्रीच्या वेळी सामाजिक कार्यासाठी आपला अनमोल वेळ देतात. ही निस्सीम सेवावृत्तीच या मंडळाचे वैचारिक अधिष्ठान आहे. या भजनी मंडळाच्या गायनात केवळ ईश्वराचा धावा नसतो, तर जागरूकतेचे बोल असतात. त्यांनी हुंडाबंदी, बालविवाह, दारूबंदी, नशाबंदी यांसारख्या ज्वलंत सामाजिक प्रश्नांवर आपल्या भजनाच्या माध्यमातून कठोर प्रहार केले आहेत. तसेच, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण आणि 'लेक वाचवा, लेक शिकवा' यांसारख्या विधायक कार्यांना त्यांनी सातत्याने हातभार लावला आहे. देऊळगाव माळीची जी काही सांस्कृतिक परंपरा आणि लौकिक आहे, ती जपण्यासाठी या मंडळाचे व त्यांचे सर्व सदस्य नेहमीच परिश्रम करतात. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे दे. माळी गावाच्या वैभवात नेहमीच भर पडत आहे. या भजनी मंडळाचे कार्य फक्त गावापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर त्यांनी तालुका आणि जिल्हाभर अनेक ठिकाणी भजनाचे कार्यक्रम करून समाजामध्ये जनजागृती आणि नवचैतन्य निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक भूमीवर 'ऋषी महाराज दत्त जनजागृती सांस्कृतिक भजनी मंडळाचे' कार्य समाज जागृतीच्या विषयाला कायम प्रेरणा देत राहील, यात शंका नाही.

**● सांस्कृतिक भजनाच्या माध्यमातून समाज जागृती करणाऱ्या आम्हा सर्व लोककलावंतांना शासनाने मानधन देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करणे गरजेचे आहे. शासनाच्या अनुदानातून ही महाराष्ट्राची लोककला पुढील काळातही निरंतर जिवंत ठेवता येईल. तरी शासन स्तरावर पाठपुरावा करून कलावंतांना मानधन देऊन त्यांचा गौरव करावा.**

अरूण मोतेकर
भजनी मंडळ कलावंत
दे.माळी.

## घटना -घडामोडी

### बुलढाणा राष्ट्रवादीत 'फोटो वाद'! देऊळगाव राजात बॅनरवरून संतापाची लाट — डॉ. रामप्रसाद शेळके यांच्ये कार्यकर्ते आक्रमक

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ राजेश पंडित

**देऊळगाव राजा :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या बुलढाणा जिल्हा अध्यक्षपदी नरेश शेळके यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. या निमित्ताने देऊळगाव राजा शहरात अभिनंदनार्थ लावण्यात आलेल्या बॅनरने आता राजकीय वादाला तोंड फुटले आहे. कारण या बॅनरमध्ये पक्षाचे ज्येष्ठ नेते, सहकार क्षेत्रातील प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि जिल्ह्यातील माजी पदाधिकारी डॉ. रामप्रसाद शेळके यांचा फोटो नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी उसळली आहे. या घटनेमुळे देऊळगाव राजा तालुक्यापासून ते संपूर्ण सिंदखेड राजा मतदारसंघात संतापाची लाट उसळली आहे. अनेक कार्यकर्त्यांनी सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया नोंदवत पक्षातील काही व्यक्तींवर 'जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचा' आरोप केला आहे. डॉ. शेळके यांना युवकांचा प्रचंड पाठिंबा असून, सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रभाव आजही कायम आहे. अशा नेत्याला बॅनरमधून वगळल्याने कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या असल्याचे मत व्यक्त होत आहे. या घटनेनंतर पक्षांतर्गत फूट पडल्याचे संकेत मिळत असून, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणुकांवर याचा परिणाम होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. देऊळगाव राजा शहरातील तसेच तालुक्यातील काही पदाधिकारी आणि जबाबदार कार्यकर्त्यांनाही या बॅनर प्रकरणात डावलण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. स्थानिक कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, सध्या पक्षात संवादाचा अभाव दिसून येत असून, कुठल्याही बैठकीसाठी किंवा कार्यक्रमासाठी त्यांना विश्वासात घेतले जात नाही. त्यामुळे पक्षाच्या एकीवर आणि संघटनेच्या स्थैर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर वरिष्ठ नेत्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. अन्यथा आगामी निवडणुकांमध्ये या फूटिचा मोठा फटका बसू शकतो, असा इशारा अनेकांनी दिला आहे.दरम्यान, या वादावर अद्याप पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नसून, वादग्रस्त बॅनर लावणाऱ्या कार्यकर्त्यांवर कारवाई होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### मेहकरमध्ये उत्पन्न दाखल्यासाठी दीडशे रुपये आकारणी: नागरिकांची लूट थांबणार का?

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ अनिल राठोड

**मेहकर :** येथील एका सेतू केंद्रावर उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी नागरिकांकडून महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त, म्हणजेच तब्बल दीडशे रुपये (रु. १५०) आकारले जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. अधिकृत दरापेक्षा दुप्पट आकारणी महाराष्ट्र शासनाच्या 'आपले सरकार सेवा केंद्रा'साठी उत्पन्नाच्या दाखल्यासाठीचे अधिकृत शुल्क साधारणपणे ₹६९ (सेवा शुल्क आणि इतर कर मिळून) किंवा काही माहितीनुसार ३४रू ते ५८रू इतके आहे. मात्र, मेहकर येथील केंद्रावर नागरिकांकडून विहित दरापेक्षा दुप्पटहून अधिक रक्कम म्हणजेच १५० रू घेतले जात आहेत, ज्यामुळे नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप आहे. नागरिकांची नाराजी, प्रशासनाचे दुर्लक्ष दररोज अनेक नागरिक, विद्यार्थी आणि शेतकरी, महत्त्वाच्या कामांसाठी उत्पन्नाचा दाखला काढण्याकरिता केंद्रावर येतात आणि त्यांना नाइलाजास्तव ही अतिरिक्त रक्कम मोजावी लागते. प्रशासनाने सर्व सेतू केंद्रांवर दरपत्रक दर्शनी भागात लावण्याचे निर्देश दिले आहेत आणि जास्त शुल्क आकारल्यास कठोर कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. असे असूनही, मेहकरमध्ये हा प्रकार सुरूच आहे. जबाबदार प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, तातडीने चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि सर्वसामान्य नागरिकांची होणारी ही आर्थिक लूट त्वरित थांबवावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.



# शिवसंकल्प प्रशिक्षण शिबिर: ५ नोव्हेंबर रोजी मेहकरमध्ये 'शिवसंकल्प' प्रशिक्षण!

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मेहकर :** बुलढाणा जिल्ह्यातील शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांसाठी ५ नोव्हेंबर २०२५ रोजी मेहकर येथे 'शिवसंकल्प' जिल्हा पदाधिकारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी आमदार संजय रायमुलकर यांनी जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे. काल शिवसेना संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ना.प्रतापराव जाधव आणि माजी.आ.संजय रायमुलकर यांनी शिबिराची सविस्तर माहिती दिली. स्थानिक 'भूमिपुत्र शेतकरी भवन' येथे उभारण्यात आलेल्या विशेष शामियान्यात हे प्रशिक्षण शिबिर पार पडेल. यामध्ये सकाळी ९ वा: पदाधिकारी व निमंत्रितांसाठी नोंदणी व अल्पोपहार. सकाळी १० वा प्रतापराव जाधव आणि सार्वजनिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांच्या उपस्थितीत उद्घाटन. 'लक्षवेध ॲप' प्रशिक्षण, 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष' यावर डॉ. राजश्री आहेर राव यांचे व्याख्यान, 'राजकारणात समाज माध्यमांचा प्रभाव' या विषयावर प्रतीक शर्मा यांचे भाषण, तर संघटन बांधणीवर शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांचे मार्गदर्शन. दुपारी सव्वा १ वा राजकारणात महिलांचा सहभाग यावर शिवसेना प्रवक्ते डॉ. ज्योती वाघमारे यांचे भाषण आणि प्रा. राजेश सरकटे (संभाजीनगर) यांचा 'शस्त्रविहार गीतांचा कार्यक्रम. दुपारी २ वा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मंत्री शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट, प्रतापराव जाधव आणि माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रशिक्षण शिबीराचा समारोप होईल. या कार्यक्रमासाठी शिवसेनेचे दिग्गज राज्याचे नेते उपस्थित राहणार असून यामध्ये शिवसेना नेते आनंदराव अडसूळ, शिवसेना सचिव संजय मोरे, आमदार मनीषाताई कायंदे, डॉ. ज्योती वाघमारे, आमदार संजय गायकवाड, माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, डॉ. शशिकांत खेडेकर, जगदीश गुप्ता, नारायण गव्हाणकर, ज्ञानेश्वर धाने पाटील, श्रीकांत देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आगामी निवडणुकांची रणनीती स्पष्ट केली.

येत्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीला प्राधान्य राहील. महायुतीतील तिन्ही पक्षांचा सन्मान राखत युती केली जाईल. इलेक्टिव्ह मेरिटवर उमेदवाऱ्या दिल्या जातील आणि सर्व निर्णय वरिष्ठांचे आदेशाने होतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी विरोधकांवर थेट हल्लाबोल केला. "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळातील अडीच वर्षांत मेहकर, लोणार तालुक्यात पाच हजार कोटींची कामे झाली आहेत. आमच्यावर टीका करणाऱ्या विरोधकांना आणि विद्यमान आमदाराला विचारा की, त्यांनी वर्षभरात एक तरी काम मंजूर करून आणले आहे का? असा सवाल त्यांनी केला.

माजी आमदार संजय रायमुलकर यांनी मेहकर शहरात ९३२ कोटींची विकास कामे केल्याची माहिती दिली आणि नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर असल्याचे स्पष्ट केले. यावेळी बाजार समिती सभापती माधवराव जाधव, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळूकर, उपजिल्हाप्रमुख किसनराव बळी, दिलीपबापू देशमुख, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, नीरज रायमुलकर, अजय उमाळकर यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.



## पिरॅमिड ध्यान शिबीराचे आयोजन

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मेहकर :** मेहकर पिरॅमिड ध्यान केंद्राद्वारे दिं ८नोव्हें २५ शनिवारला संत गजानन महाराज मंदिर डोणगाव रोड , मेहकर येथे निशुल्क ध्यानयोग शिबीराचे आयोजन दुपारी १ ते ७ पर्यंत करण्यात आलेले आहे . याप्रसंगी प्रमुख वक्ते ध्यानरत्न सिनियर पिरॅमिड मास्टर पी .व्ही . रामा राजू यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळणार आहे . तसेच सिनियर पिरॅमिड मास्टर सौ. देवयाणी नवगजे व चंद्रकांता जाधव ह्या ध्यान पद्धतीच्या बारकाव्यांचे प्रात्यक्षिका द्वारे तंत्रबद्ध पद्धतीने प्रशिक्षण देणार आहे .

हे शिबीर सर्व वयोगटातील व्यक्तिंसाठीआपले जीवन सुखी समृद्ध होणेसाठी , मनाचे संतुलन साधनेसाठी , कार्यक्षमता वृध्दी व बुद्धीचा विकास होणेसाठी ' सकारात्मकता व निरोगी शरीर स्वास्थासाठी महत्वाची भूमिका बजावते नियमित ध्यान केल्याने असाध्य आजारांवर मात करता येते राग , नैराश्य इ मानसिक विकारापासून मुक्ति मिळते शरीरातील ऊर्जा केंद्रे (चक्रे ) संतुलीत होऊन रोगप्रतिकार शक्ति वाढते . म्हणून मेहकर परिसरातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून निशुल्क शिबीरांचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक पिरॅमिड ध्यान केंद्र मेहकर द्वारे करण्यात आलेले आहे . शिबीरार्थ्यांसाठी अन्न प्रसादाची व्यवस्था निशुल्कच करण्यात आली आहे . फक्त ऐच्छीक देणगी स्विकारली जाईल .

## कु. स्नेहा भुतडा हिचा आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक; महेश परिवाराकडून भव्य सत्कार

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ कैलास राऊत

**मेहकर :** कला, शिक्षण आणि संस्कृतीच्या क्षेत्रात आपल्या विद्यार्थ्यांनी मिळवलेला गौरव हा शाळेसाठी सर्वोच्च अभिमानाचा क्षण असतो. याच अनुषंगाने, महेश विद्यालय परिवाराने आपल्या गुणी विद्यार्थिनी कुमारी स्नेहा सुभाष भुतडा हिचे दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयात हार्दिक स्वागत व सत्कार केला. स्नेहाने आपल्या उत्कृष्ट कलागुणांनी विद्यालय, परिवार आणि संपूर्ण समाजाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. नृत्यकलेतून भारताचे प्रतिनिधित्व स्नेहा भुतडा हिने ANASS, INDIA (Akhil Natrajam Aantar Sanskritik Sangh) या संस्थेने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ऑनलाइन नृत्य स्पर्धेत सहभाग घेतला होता.

तिने Bollywood Solo Dance Category मध्ये भाग घेत, आपल्या दमदार आणि लयबद्ध नृत्याच्या बळावर द्वितीय क्रमांक (2nd Award) पटकावला.

ही स्पर्धा १९ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती व निकाल १९ सप्टेंबर २०२६ रोजी जाहीर झाले. विशेष म्हणजे, ही आयोजक संस्था International Dance Council CID, Paris France या जागतिक संस्थेशी संलग्न आहे. स्नेहाने मिळवलेला हा द्वितीय क्रमांक तिच्या कलासाधनेची आणि अथक प्रयत्नांची साक्ष देतो. विद्यालयाकडून अभिनंदनाचा वर्षाव स्नेहाच्या या उल्लेखनीय आणि जागतिक स्तरावरील यशाबद्दल महेश विद्यालय परिवाराला तिचा मनस्वी अभिमान वाटत आहे. सत्कार समारंभात उपस्थित शिक्षक, पालक आणि कर्मचाऱ्यांनी तिचे भरभरून अभिनंदन केले. स्नेहाच्या नृत्यातील कौशल्य आणि मेहनतीचे कौतुक करत, तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी व पुढील कला प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.



## गणेश नागरे यांच्या भाजप प्रवेशामुळे देऊळगाव मही सर्कलमध्ये भाजपचे बळ वाढणार!

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ शिवाजी वायाळ

**देऊळगाव मही :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सिं.राजा मतदारसंघातील राजकीय पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दे.मही जिल्हा परिषद सर्कलमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. स्थानिक युवा नेतृत्वाचे गणेश नागरे यांनी २ नोव्हेंबर रोजी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला, ज्यामुळे परिसरातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांनी अनेकवेळा प्रयत्न करूनही या सर्कलमध्ये भाजपचे 'कमळ' पूर्णपणे फुलले नव्हते. मात्र, गणेश नागरे यांच्या रूपाने पक्षाला खेड्यापाड्यातील सर्वसामान्य नागरिकांशी नाळ जोडलेला, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात चांगली पकड असलेला एक तगडा तरुण चेहरा मिळाला आहे.

नागरे कुटुंबाचा प्रभाव: गणेश नागरे यांचे आजोबा माजी जिल्हा परिषद सदस्य होते, तर पत्नी बायगाव नगरी ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच आहेत. त्यांच्या कुटुंबाचा राजकीय आणि सामाजिक प्रभाव ग्रामीण भागात मोठा आहे. देऊळगाव राजा येथे २ नोव्हेंबर रोजी झालेल्या प्रवेश सोहळ्याला आमदार वसंत खंडेलवाल, भाजप जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराव शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश माटे, ज्येष्ठ नेते शंकर उगलमुगले, भगवान मुंडे, एकनाथ काकड, प्रभाकर नागरे, संजय मुंडे, शिवाजी वाघ, निशिकांत भावसार, गणेश पालवे आदी मान्यवर उपस्थित होते. नागरे यांचे मत: यावेळी बोलताना गणेश नागरे म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील विकासकामे प्रभावीपणे राबवण्यासाठी मी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. पक्षाचे विचार गावोगावी पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे." राजकीय जाणकारांनुसार, नागरे यांच्या प्रवेशामुळे आगामी जि. प. आणि पं. स. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपला संघटनात्मक बळ मिळणार असून, देऊळगाव मही परिसरातील सत्ता समीकरणात महत्त्वपूर्ण घडामोडी घडण्याची चिन्हे आहेत.



## समर्थ कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा

**सिंदखेडराजा :** डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला अंतर्गत समर्थ कृषी महाविद्यालय, दे. राजा येथील राष्ट्रीय सेवा योजना (रा. से. यो.) एककाच्या वतीने राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. देशाच्या एकता व अखंडतेचे प्रतिक असलेल्या लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. एन. बी. मेहेत्रे यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली.यानंतर प्राचार्य डॉ. मेहेत्रे यांनी 'एक भारत – श्रेष्ठ भारत' या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना देशातील विविधतेत एकता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.विद्यार्थ्यांनी देखील राष्ट्रीय एकता, एकात्मता व देशभक्ती यांवर आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रीय एकता शपथ सर्व सहभागींकडून उत्स्फूर्तपणे घेण्यात आली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. वाय. एस. चगदळे यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.




## धर्मदाय आयुक्त कार्यालयातील विजय नरवाडे यांची लाचेच्या आरोपातून निर्दोष सुटका

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**बुलढाणा :** सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बुलडाणा येथे तत्कालीन कार्यरत असलेले अव्वल कारकून विजय पंढरी नरवाडे यांची न्यायालयाने लाचखोरीच्या प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली आहे. विशेष न्यायालय बुलडाणाचे विशेष न्यायाधीश श्रीमती मंजुषा व्ही. देशपांडे यांनी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल सुनावला.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बुलडाणा येथे सन २०१३ मध्ये कार्यरत असलेले अव्वल कारकून विजय पंढरी नरवाडे यांच्या विरोधात खामगाव येथील रहिवासी शेखर ओमप्रकाश शर्मा यांनी लाच लुचपत विभाग बुलढाणा यांच्याकडे तक्रार दिली होती. त्यांना आदर्श बहुउद्देशीय संस्था खामगाव या नावाने धर्मदाय आयुक्त कार्यालय बुलढाणा येथे संस्थेची नोंदणी करावयाची होती. या संस्थेची नोंदणी करून देण्यासाठी सदर कार्यालयात कार्यरत असलेले अव्वल कारकून विजय नरवाडे यांनी त्यांच्याकडे दोन हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली, असे शर्मा यांनी तक्रारीत नमूद केले होते.



लाच लुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांनी २४ जानेवारी २०१३ रोजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बुलढाणा येथे सापळा रचून कारवाई केली असता अव्वल कारकून विजय पंढरी नरवाडे यांनी दोन हजार रुपयाचे लाचेची मागणी करून लाच स्वीकारल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तपास अधिकारी - एस. एल. मुंढे, डीवायएसपी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग बुलडाणा यांनी तपास पूर्ण केल्यानंतर तत्कालीन धर्मदाय आयुक्त मुंबई तथा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विश्वास जाधव यांनी खटला दाखल करण्यास मंजुरी प्रदान केली व सदर प्रकरण न्यायालयात सुरू झाले. याप्रकरणी सरकार पक्षा तर्फे फिर्यादी शेखर शर्मा , सापळा कारवाईतील पंच क्र. 1 सतिष कोल्हे, सक्षम अधिकारी निवृत्त न्यायमूर्ती व्ही. के. जाधव व तपास अधिकारी मुंढे यांची साक्ष नोंदवीली. आरोपी विजय नरवाडे यांच्यावतीने ॲड. शर्वरी सावजी तुपकर यांनी न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडली. आरोपीच्या वतीने युक्तिवाद करताना ॲड. शर्वरी सावजी तुपकर यांनी न्यायालयाचे लक्षात आणून दिले की, फिर्यादी शेखर शर्मा हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून खुनाच्या दोन प्रकरणांचा त्यांचेवर आरोप आहे. कथित लाचेची रक्कम आरोपी नरवाडे जवळ सापडलेली नाही तर कपाटात सापडलेली आहे व तिथे ती रक्कम कोणालाही ठेवता येते, यावरून आरोपीने लाच स्वीकारली हे सिद्ध होत नाही. तसेच फिर्यादीच्या संस्था नोंदणीचा प्रस्ताव मंजूर करायचा किंवा नाही हे आरोपीच्या हातात नाही, त्यामुळे यासाठी आरोपीने लाच मागणे व घेणेचा प्रश्नच उद्भवत नाही. शिवाय या प्रकरणाच्या तपासामध्ये खूप त्रुटी आहेत, सक्षम अधिकाऱ्यांनी विचार न करता मंजूरात प्रदान केलेली आहे, त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीस मिळावा असा प्रभावी युक्तीवाद ॲड. शर्वरी सावजी - तुपकर यांनी न्यायालयासमोर केला. फिर्यादीची गुन्हेगारी पार्श्वभूमी , साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यातील तफावती, तपासातील व मंजुरी आदेशातील त्रुटी लक्षात घेऊन आरोपीची सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे एका आरोपीने केलेल्या लाचेच्या आरोपातून मुक्त होण्यास आरोपी विजय नरवाडेला तब्बल १२ वर्ष लागले.